नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २९४ | Issue - 294 | वार बुधवार दि. १२ मार्च २०२५ | Blow- Wednesday Date 12 March 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### दररोज सरासरी सात शेतकऱ्यांच्या आत्महत्या; राज्य सरकारची विधान परिषदेत कबुली

मुंबई : राज्यात हवामान बदल, ओला, कोरडा दुष्काळ, नापिकी, कर्जबाजारीपणामुळे २०२४ मध्ये रोज सरासरी सात प्रमाणे वर्षभरात २,७०६ शेतकरी आत्महत्या झाल्या आ-हेत. छत्रपती संभाजीनगर, अमरावती विभागात शेतकरी आत्महत्येची स्थिती गंभीर आहे. मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी शेतकरी आत्महत्येचा प्रश्न गंभीर असल्याची कबुलीही दिली आहे.

विधान परिषदेत शिवाजीराव गर्जे, अमोल मिटकरी आदींनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री मकरंद जाधव-पाटील म्हणाले, २०२४ मध्ये वर्षभरात एकूण २,७०६ शेतकरी आत्म हत्या झाल्या आहेत. यापैकी १,५६३ आत्महत्या सरकारी मदतीला पात्र आहेत, तर ४१९ प्रकरणांची चौकशी सुरू आहे. सरकारकडून मदत देण्यात आलेली प्रकरणे १,१०१ आहेत.

शेतकरी आत्महत्यांची स्थिती छत्रपती संभाजीनगर, अमरा-वती विभागात भीषण आहे. छत्रपती संभाजीनगर विभागामध्ये वर्षभरात ९५२ आत्महत्या झाल्या आहेत. त्यात बीडमधील २०५ आत्महत्यांचा समावेश आहे. अमरावती विभागात १,०६९ आत्महत्या झाल्या. त्यात अमरावती जिल्ह्यात २००, अकोल्यात १६८ आणि वर्धा जिल्ह्यात ११२ आत्म हत्यांचा समावेश आहे.

### शेतकऱ्यांना आकारी पड जमिनी परत, दुरुस्ती विधेयक विधान परिषदेत मंजूर

मुंबई : शेतकऱ्यांनी आकारी पड जमिनीच्या चालू वर्षाच्या प्रचलित बाजार मूल्याच्या प्रस्तावित २५ टक्के रकमेऐवजी ५ टक्के रक्कम शासनास जमा केल्यास, हस्तांतरणास निर्बंध, या अटीवर ही जमीन त्यांना परत करण्यात येईल. याचा लाभ राज्यातील ९६३ शेतकऱ्यांना मिळणार आहे. या बाबतचे विधेयक विधान परिषदेत मंगळवारी मंजूर झाले.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ सुधारणा विधेयक विधान परिषदेत मंजूर झाले होते, त्याला मंगळवारी विधान परिषदेने बहुमताने मंजुरी दिली.

नव्या तरतुदीनुसार, तगाई किंवा तत्सम थकबाकी न भरल्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २२० नुसार अशा जमिनींचा लिलाव होऊन त्या आकारी पड म्हणून शासन जमा करण्यात येतात. राज्यात अशी ४ हजार ८४९ एकर जमीन शासन जमा झाली आहे. अशा जमिनी थकबाकीची देय रक्कम आणि त्यावरील व्याज १२ वर्षांच्या आत भरणा केल्यास मूळ खातेदारांना परत करण्याची तरतूद कायद्यात आहे. तथापि, १२ वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यावर अशा जमिनी मूळ मालकांना परत करण्याची तरतूद नव्हती. ही तरतूद बदलण्यात येणार आहे.

आकारी पड जमिनी म्हणजे? शेत जमीन मालकांनी शेतसारा भरला नाही, पिके घेतली नाहीत, अशा जमिनीच्या सात बारा उताऱ्यावर सरकारने मालकी हक्क लावला. मात्र, या जमिनी मूळ मालकाकडेच ठेवण्यात आल्या. त्यामुळे जमिनी मालकाची वहिवाट असली, तरी या जमिनीच्या सात बारा उताऱ्यावर सरकारी मालकी असल्यामुळे त्यांना आकारी पड जमीन म्हटले जाते.

# आता प्रार्थना स्थळ, मशिदींवरील भोंग्यावर कारवाई होणार

## कडक कारवाईसाठी नियमात बदल करणार; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा स्पष्ट इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईसह महाराष्ट्रातील विविध भागातील प्रार्थना स्थळ, मशिदींवरील भोंग्यामुळे ध्वनी प्रदूषण होत असल्याचा मुद्दा विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांनी उपस्थित केला होता. मुंबई उच्च न्यायालयाने २५ जानेवारी २०२५ रोजी आदेश देऊन मशिदींसह प्रार्थना स्थळांकडून ध्वनी प्रदूषण प्रतिबंध नियमांचे उल्लंघन होणार नाही, असे आदेश दिले होते. मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही, हा मुद्दा भाजपाच्या आमदार देवयानी फरांदे यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सुचनेद्वारा मांडला. उत्तर प्रदेश सरकारने ज्याप्रकारे भोंग्यावर कारवाई केली आहे, त्याप्रमाणे राज्य सरकारही कारवाई करणार का? असा प्रश्न आमदार फरांदे यांनी विचारला होता. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर उत्तर दिले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कुठल्याही प्रार्थनास्थळावर भोंगे लावण्याआधी परवानगी घेतली पाहिजे. रात्री १० वाजल्यापासून सकाळी ६ वाजेपर्यंत भोंगे बंद असले पाहिजेत. सकाळी ६ ते रात्री १० वाजण्याच्या कालावधीत दिवसा ५५ डेसिबल आणि रात्री ४४ डेसिबलची आवाज मर्यादा असली पाहिजे. कायद्यानुसार अधिक डेसिबलने भोंगे वाजत असतील तर त्यावर कारवाई करण्याचे अधिकार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला केंद्रीय कायद्याने दिले आहेत. पोलिसांनी याची दखल घेऊन प्रदूषण नियंत्रण मंडळाला कळवायचे आहे, अशी सध्या कायद्याची तरतूद आहे. मात्र याचा अवलंब सध्या होताना दिसत नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, यापुढे कुणालाही सरसकट भोंग्यांची परवानगी देण्यात येणार नाही. निश्चित कालावधीकरताच भोंगे लाव-ता येतील. त्यानंतर पुन्हा भोंगे लावायचे असल्यास संबंधितांनी पुन्हा पोलिसांकडून परव-ानगी घ्यावी. ज्याठिकाणी आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन होईल, त्यांना पुन्हा परवानगी दिली जाणार नाही. तसेच भोंग्यांची जप्ती केली जाईल. तसेच या नियमांचे तंतोतंत पालन होत आहे की नाही? हे पाहण्याची जबाबदारी पो-लीस निरीक्षकाची असेल.

जर पोलीस निरीक्षकांनी याचे तंतोतंत पालन केले नाही, तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असेही मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्षवेधीचे उत्तर देताना स्पष्ट केले

पोलीस निरीक्षकाने प्रत्येक प्रार्थना स्थळात जाऊन भोंग्याची परवानगी घेतली आहे की नाही? याची तपासणी केली पाहिजे. भोंग्याचे डेसिबल मोजून आवाजा-ची मर्यादा ओलांडली असेल तर पहिल्या टप्प्यात प्रदूषण नियंत्रक मंडळाला सांगणे आणि दुसऱ्या टप्प्यात पुन्हा परवानग्या न देण्याचा मार्ग अवलंबला पाहिजे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

प्रचलित कायद्यानुसार पोलिसांकडे फारसे अधिकार नाहीत. कारण कारवाईचे अधिकार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक मंडळाला आहेत. त्यामुळे नियमांमध्येही काही प्रमाणात बदल करणे अपेक्षित आहे. हे बदल झाल्यास भोंग्यावर अधिक प्रभावी कारवाई करता येईल. यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून नियमांमध्ये बदल करण्यास सुचविले जाईल, असेही यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# भाजपकडून विधान परिषदेसाठी केचे, राजूरकर, भंडारी यांची नावे चर्चेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधान परिषदेच्या ५ जागांसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. विधान परिषदेच्या ५ सदस्यांनी विधानसभा निवडणूक लढवली होती. त्यांचा निवडणुकीत विजय झाल्यामुळे विधान परिषदेच्या ५ जागा या रिक्त झाल्या आहेत. या ५ जागांसाठी काही दिवसांपूर्वी निवडणूक जाहीर झाली. यानंतर आता कोणत्या पक्षाकडून कुणाला उमेदव-ारी दिली जाणार याबाबतची उत्सुकता आहे. या दरम्यान भाजपच्या गोटातून मोठी बातमी समोर येत आहे. भाजपने विधान परिषदेच्या ३ जागांसाठी उमेदवारांची नावे निश्चित केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

महाराष्ट्रातील भाजप नेत्यांनी तीन नेत्यांची नावे दिल्लीच्या पक्षश्रेष्ठींकडे पाठवली आहेत. पक्षश्रेष्ठींकडून हिरवा कंदील मिळाल्यानंतर त्या तीन नेत्यांची उमेदवारी निश्चित होणार आहे. दादाराव केचे, अमरनाथ राजूरकर आणि माधव भंडारी यांची नावे महाराष्ट्र भाजपकडून दिल्लीला पक्षश्रेष्ठींकडे पाठवण्यात आल्याची माहिती सूत्राने दिली आहे.

राज्याचं सध्या अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे. या अधिवेशनानंतर २७ मार्चला विधान परिषदेच्या ५ जागांसाठी मतदान होणार आहे. मतदानानंतर त्याच दिवशी मतमोजणी देखील होणार आहे. त्यामुळे त्यात दिवशी निकालदेखील समोर येणार आहे. या निवडणुकीत भाजपच्या वाटेला तीन तर राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेच्या वाटेला प्रत्येकी एक जागा आल्या आहेत. या जागांवर उमेदव-ारी मिळावी यासाठी जोरदार लॉबिंग केली जात आहे. असं असताना भाजपची तीन नावे निश्चित झाल्याची माहिती आहे. विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातही हालचालींना वेग आला आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार निश्चित करण्यासाठी महत्त्वाची बैठक पार पडत आहे. राष्ट्रवादीच्या आमदारांच्या बैठकीनंतर पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक होणार आहे. या बैठकीत उमेदवार निश्चित केला जाणार आहे. अनेकजण उमेदवारीसाठी इच्छुक आहेत. पण आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बघून पक्षाकडून संधी दिली जाणार आहे, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. दरम्यान, शिवसेनेकडून काँग्रेसमधून शिवसेनेत प्रवेश केलेले रवींद्र धंगेकर यांना संधी दिली जाते का? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मॉरिशसचा सर्वोच्च पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या दोन दिवसांच्या मॉरिशस दौऱ्यावर आहेत. दरम्यान मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांनी मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्यांच्या देशाचा सर्वोच्च पुरस्कार 'द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ द इंडियन ओशन' देण्याची घोषणा केली आहे. मॉरिशसचा हा सर्वोच्च पुरस्कार मिळवणारे पंतप्रधान मोदी हे पहिले भारतीय ठरले आहेत.



पोर्ट लुईस येथे झालेल्या भारतीय समुदायाच्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोरच रामगुलाम यांनी ही घोषणा केली. यानंतर मॉरिशसच्या सर्वोच्च सन्मानाने सन्मानित केल्याबद्दल पंतप्रधान मोदींनी रामगुलाम यांचे आभार मानले. यावेळी ते म्हणाले की, त्यांनी मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांचा निर्णय नम्रतेने स्वीकारला आहे. दरम्यान, पंतप्रधान मोदींना आतापर्यंत विविध देशांकडून २१ पुरस्कार मिळाले आहेत. हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर प्रतिक्रिया देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, मॉरिशसच्या पंतप्रधानांनी नुकतेच जाहीर केले की, ते मला त्यांचा सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करणार आहेत. मी त्यांचा निर्णय नम्रतेने स्वीकारू इच्छितो. हा भारत आणि मॉरिशसच्या ऐतिहासिक संबंधांचा सन्मान आहे.

मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांनी सांगितले की, १२ मार्च १९९२ रोजी मॉरिशस प्रजासत्ताक झाल्यापासून पाच परदेशी मान्यवरांना 'द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ द इंडियन ओशन' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. दरम्यान १९९८ मध्ये नेल्सन मंडेला हे या पुरस्काराचे पहिले मानकरी ठरले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना यापूर्वी बार्बाडोस, गयाना, रशिया, भूतान, फ्रान्स, इजिप्त आणि अमेरिका या देशांकडून सर्वोच्च सन्मान मिळाला आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या मॉरिशस दौऱ्यावर आहेत. आज सकाळी ते पोर्ट लुईस येथे पोहोचले. उद्या, १२ मार्च रोजी होणाऱ्या मॉरिशसच्या राष्ट्रीय दिनाच्या समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या समारंभात भारतीय नौदलाच्या जहाजासह भारतीय संरक्षण दलांची एक तुकडीही सहभागी होणार आहे.

# ५० लाख लाडक्या बहिणी अपात्र ठरणार, भास्कर जाधव यांची भीती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याच्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री 'माझी लाडकी बहीण' योजनेसाठी ३६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. गेल्या वर्षी ही तरतूद ४६ हजार कोटी होती. या अर्थसंकल्पात १० हजार कोटी रुपये कमी करण्यात आले आहेत. लाडक्या बहिणीं-ची संख्या टप्प्याटप्प्याने कमी केली जाणार आहे. अडीच कोटी लाडक्या बहिणींपैकी पाच लाख अपात्र ठरविल्या गेल्या आहेत. येत्या काळात ५० लाख लाडक्या बहिणींची संख्या कमी होण्याची भीती शिवसेना (ठाकरे) गटनेते भास्कर जाधव यांनी विधानसभेत व्यक्त केली.



लाडकी बहीण योजनेतील २ कोटी ६३ लाख अर्जांची पडताळणी सुरू आहे. त्यासाठी परिवहन विभाग आणि केंद्र व राज्य सरकारी योजनांच्या लाभार्थींची यादी तपासली जात आहे. आयकर विभागाकडे दीड कोटी लाडक्या बहिणींची यादी मागविण्यात आली आहे. केसरी व पिवळे शिधापत्रिका असलेल्या एक कोटी लाडक्या बहिणींना या पडताळणीतून वगळण्यात आले आहे. जानेवारीत २ कोटी ४६ लाख लाभार्थींतून पाच लाख अपात्र ठरल्याने २ कोटी ४१ बहिणींना अनुदान देण्यात आले. फेब्रुवारी व मार्चसाठी लाभार्थींची संख्या वाढली आहे.

अर्जांची काटेकोर पडताळणी करण्याचे आदेश स्थानिक पातळीवरील अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. सरकारला २१०० रुपये लाडक्या बहीणींना देणार आहे. ते कधी देणार हे जाहीर करण्यात आलेले नाही. योजने-तील पात्र बहीणींची पडताळणी मार्च नंतर अधिक तीव्र केली जाणार आहे. मार्च अखेर असल्याने आयकर विभागाकडून अद्याप यादी मिळालेली नाही. ही यादी मिळाल्यानंतर लाखो बहीणी अपात्र ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## राज्यसभेत केंद्र सरकारच्या शैक्षणिक धोरणावर अल्पकालीन चर्चा

## खरगेंच्या वक्तव्यावरून वाद

# दुसऱ्या दिवशीही गदारोळ, 'एनईपी'वरून विरोधक आक्रमक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : नव्या शैक्षणिक धोरणातील तीन भाषेच्या सक्तीच्या मुद्द्यावरून मंगळव-ारीही संसदेत गदारोळ झाला. राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी, शैक्षणिक धोरणावर केंद्र सरकारला ठोकून काढले जाईल, असे आक्रमक विधान करताच सभागृहात 'एनडीए'च्या सदस्यांनी प्रचंड गोंधळ घातला. सभागृह नेते जे. पी. नड्डा यांनी, खरगेंच्या माफीची मागणी केली. त्यानंतर खरगेंनी उपसभापती हरिवंश यांची माफी मागत विषयावर पडदा टाकला.

राज्यसभेत केंद्र सरकारच्या शैक्षणिक धोरणावर अल्पकालीन चर्चा आयोजित केली होती. त्याआधी द्रमुकचे सदस्य केंद्र सरकारच्या तीन भाषेच्या सक्तीची निषेध करत होते. मात्र, उपसभापती हरिवंश यांनी द्रमुकच्या सदस्यांना रोखण्याचा प्रयत्न केला व काँग्रेसचे खासदार दिग्विजय सिंह यांना चर्चा सुरू करण्यास सांगितले. पण, सभागृहात गोंधळ असल्याने बोलता येत नाही, सभागृहात शांतता निर्माण करणे माझे काम नाही, असे दिग्विजय यांचे म्हणणे होते.



यावेळी खरगेंनी उपसभापतींना द्रमुकच्या सदस्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची विनंती करताना उपसभापतींकडे बघत आम्ही ठोकून काढू, असे विधान केले. या वक्तव्यावर आ-क्षेप घेत, ''हे विधान उपसभापतींचा अपमान करणारे आहे. या विधानाला माफी देता येणार नाही. अशी आक्षेपार्ह भाषा निंदनीय आहे. खरगेंनी उपसभापतींची माफी मागावी,'' अशी मागणी नड्डा यांनी केली. त्यावर खरगेंनी, उपसभापतींची माफी मागितली. त्याचवेळी, ''केंद्राच्या शैक्षणिक धोरणाला कडाडून विरोध करू. शैक्षणिक धोरणाच्या आधारे देशात भेद निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे,'' असे ते म्हणाले. त्यावर नड्डा यांनी खरगेंनी केंद्र सरकारला उद्देशून आक्षेपार्ह विधान केले असेल तर तेही स्वीकारले जाणार नाही. त्यांनी सरकारचीही माफी मागितली पाहिजे किंवा ते कामकाजाच्या इतिवृत्तातून काढून टाकावे. मात्र, खरगेंनी सरकारची माफी मागण्यास नकार दिला.

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी द्रमुकच्या तीन भाषांच्या सक्तीला असलेल्या विरोधावर सोमवारी लोकसभेत तीव्र टीका करताना द्रमुकच्या कणिमोळी यांचे नाव घेतले. त्यामुळे त्यांनी प्रधान यांच्याविरोधात हक्कभंगाची नोटीस बजावली आहे.

केंद्राच्या नव्या शैक्षणिक या धोरणाविरोधात व प्रधान यांच्या आक्षेपार्ह टिप्पणीचा निषेध करण्यासाठी मंगळवारी द्रमुकच्या खासदारांनी संसदेच्या आवारात निदर्शने केली. लोकसभेमध्येही द्रमुकच्या सदस्यांनी घोषणाबाजी केली. राज्यसभेत उपसभापती हरिवंश यांनी द्रमुकच्या सदस्यांचे म्हणणे ऐकण्यास नकार दिल्यानंतर त्यांनी सभात्याग केला.

## संपादकीय....

### पंतप्रधानांचा गौरव

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या दोन दिवसांच्या मॉरिशस दौऱ्यावर आहेत. दरम्यान मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांनी मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्यांच्या देशाचा सर्वोच्च पुरस्कार 'द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ द इंडियन ओशन' देण्याची घोषणा केली आहे. मॉरिशसचा हा सर्वोच्च पुरस्कार मिळवणारे पंतप्रधान मोदी हे पहिले भारतीय ठरले आहेत. पोर्ट लुईस येथे झालेल्या भारतीय समुदायाच्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोरच रामगुलाम यांनी ही घोषणा केली. यानंतर मॉरिशसच्या सर्वोच्च सन्मानाने सन्मानित केल्याबद्दल पंतप्रधान मोदींनी रामगुलाम यांचे आभार मानले. यावेळी ते म्हणाले की, त्यांनी मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांचा निर्णय नम्रतेने स्वीकारला आहे. दरम्यान, पंतप्रधान मोदींना आतापर्यंत विविध देशांकडून २१ पुरस्कार मिळाले आहेत. हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर प्रतिक्रिया देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, मॉरिशसच्या पंतप्रधानांनी नुकतेच जाहीर केले की, ते मला त्यांचा सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करणार आहेत. मी त्यांचा निर्णय नम्रतेने स्वीकारू इच्छितो. हा भारत आणि मॉरिशसच्या ऐतिहासिक संबंधांचा सन्मान आहे. मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांनी सांगितले की, १२ मार्च १९९२ रोजी मॉरिशस प्रजासत्ताक झाल्यापासून पाच परदेशी मान्यवरांना 'द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ द इंडियन ओशन' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. दरम्यान १९९८ मध्ये नेल्सन मंडेला हे या पुरस्काराचे पहिले मानकरी ठरले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना यापूर्वी बार्बाडोस, गयाना, रशिया, भूतान, फ्रान्स, इजिप्त आणि अमेरिका या देशांकडून सर्वोच्च सन्मान मिळाला आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या मॉरिशस दौऱ्यावर आहेत.

# तडफडणाऱ्या पक्ष्याला विद्यार्थ्यांनी दिले जीवदान

## बी.के. कावळे विद्यालयाच्या प्रांगणात घडलेली घटना



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड /प्रतिनिधी

भूतदया हे फक्त पुस्तकात न वाचता तिचा वापर कृतीतून व्हायला हवा तेव्हाच जीवाला खरा आनंद प्राप्त होत असतो हाच आदर्श नुकतेच बी के कावळे विद्यालयातील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी समाजासमोर ठेवला आहे

का ग बस सहकारी साखर कारखाना राजाराम नगर येथील बी के कावळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात एक पक्षी कावळ्यांनी जखमी केल्यामुळे तडफड करताना दिसून आला ही बाब शिक्षकांच्या लक्षात येताच , व्ही.आर पगार, सलादे, एम ए खुळे व विद्यार्थ्यांच्या मदतीने या पक्षाला वाचविण्यासाठी प्रयत्न केले त्यावर प्राथमिक स्वरूपात उपचार करून त्याला अन्न पाणी देऊन पक्षाला जीवदान दिले. यामुळे सर्वांनाच मनस्वी आनंद झाला विद्यालयाचे प्राचार्य व्ही जे जाधव यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले.

> **सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू झाले असून प्रत्येक नागरिकाने आपल्या घराजवळ थोडे अन्न व भांड्यात पाणी भरून ठेवावे, जेणेकरून पक्षी मुके प्राणी अन्न पाण्या वाचून मारणार नाही... यामुळे नक्कीच पक्षांना अन्नपाण्याची सोय होईल व मनाला खरी ईश्वर सेवा केल्याचे समाधान मिळेल**
> **प्रा.व्हि.जे.जाधव (बि.के.कावळे विद्यालय राजाराम नगर)**

# महिला दिनानिमित्त सातनदुधनी येथे जय दुर्गादेवी समाजसेवी संस्थेच्या वतीने महिलांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट/प्रतिनिधी

जागतिक महिला दिनानिमित्त सातनदुधनी येथे जय दुर्गादेवी समाजसेवी संस्थेच्या वतीने महिलांचा सत्कार करण्यात आला.

अक्कलकोट तालुक्यातील सातनदुधनी येथील जय दुर्गादेवी बहुउद्देशीय समाजसेवी संस्थेकडून जागतिक महिला दिनानिमित्त गावातील जेष्ठ महिलांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जय दुर्गादेवी संस्थेच्या सदस्या सौ कविता कोळी या होत्या .

येथील ज्येष्ठ महिला आणि जिल्हा परिषद प्रा. मराठी शाळा सातनदुधनी येथील शालेय पोषण आहार योजने मधील स्वयंपाकी सौ कलवा कोळी यांचा सत्कार सोमेश्वर महिला स्वयंसहायता बचत गटाच्या अध्यक्षा सौ प्रभावंती कुंभार यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी सोमेश्वर स्वयंसहायता महिला बचत गट अध्यक्षा सौ प्रभावती कुंभार यांचा सत्कार जय दुर्गादेवी स्वयंसहायता महिला बचत गट सचिव सौ ऐश्वर्या कोळी यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी वृक्ष देऊन सर्व महिलांचा सन्मान करण्यात आले. सौ लक्ष्मी सोलंकर सौ गुरुबाई कोळी बानुबा गिलकी अंबिका कोळी सुशाबाई देवकाते मलव्वा कोळी .कु.श्रावणी देवकते वैष्णवी कोळी श्रद्धा देवकते श्रावणी कोळी व जय दुर्गादेवी महिला स्वयंसहायता बचत गट सर्व पदाधिकारी उपस्थित होते आभार यावेळी आभार प्रदर्शन ऐश्वर्या कोळी यांनी मानले..

# श्री भारत गदगे यांना जीवन गौरव पुरस्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपुरातील सुप्रसिद्ध चित्रकार लोकमान्य विद्यालयाचे मा. पर्यवेक्षक श्री भारत गदगे सर यांना सोलापूर जिल्हा कला अध्यापक संघाच्या वतीने जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले डॉक्टर किर्लोस्कर सभा राहत ही.ने. वाचनालय येथे हा पुरस्कार सोहळा संपन्न झाला त्यांना प्राचार्य श्री सुधीर देवरकोंडा, मा गोपाळराव डांगे, मा भवर राठोड, डिजाईनचे व्यवस्थापक धर्मेश टंक, मुख्याध्यापक गोपनीय नवले, मा सतीश सुभेदार, त्यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार रविवार दिनांक ९ मार्च रोजी प्रदान करण्यात आला.

श्री भारत गदगे सर हे पंढरपूरचे उत्तम चित्रकार असून त्यांच्या चित्राचे प्रदर्शन नामांकित कला जालनामध्ये कित्येक वेळा भरवले गेले आहे श्री विठ्ठल रुक्मिणी सुंदर अशा प्लॅस्टरच्या मूर्ती काही ठिकाणी पाहताना मिळतातच राष्ट्रपती व राजभावनाच्याही त्यांच्या चित्रांना स्थान मिळाले आहे काही शास्त्रीय संगीत कार्यक्रम चालू असताना त्यांनी अनेक गायक वादकांची तेथे चित्रे काढून त्यांना भेट दिली आहे चित्रकार म्हणून ते त्या प्रसिद्ध तर आहेतच पण एक चांगले मित्र व शिक्षक म्हणूनही ते आपल्या मित्र कंपनीमध्ये प्रसिद्ध आहेत अशा योग्य शिक्षकांच्या चित्रकलेचा सन्मान झाल्यामुळे पुरस्कार देण्यात संस्थेचा नावलौकिक वाढलेला आहे असे वाटते.

श्री भारत गदगे यांना जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# महिला दिनानिमित्त आंबेडकर जनमंच संघटनेतर्फे महिलांचा सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
इंदापूर प्रतिनिधी:अतुल सोनकांबळे : आंबेडकर जन्मंच सामाजिक संघटनेच्या इंदापूर तालुक्यातील व माढा करमाळा सोलापूर पुणे विभागातून आंबेडकरी जन मंच संघटनेला जोडलेल्या सर्व महिला पदाधिकाऱ्यांची आज इंदापूर येथे बैठक संपन्न झाली

आंबेडकरी चळवळीतील महत्त्वपूर्ण विषयावर चर्चा करण्यात आली आंबेडकर जन्मंच संघटना महाराष्ट्र राज्य संघटनेच्या सर्व महिला पदाधिकाऱ्यांना ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या समाजातील विविध घटकांवरती झालेले अन्याय विरोधात लढा देण्यासाठी पुढची रणनीती तयार करण्यात आली .

पारधी समाजातील सुशिक्षित मुला-मुलींच्या नोकरी संदर्भात व त्यांच्या कायमस्वरूपी निवासा संदर्भात शासकीय योजना या विषयावरही चर्चा करण्यात आली आंबेडकर जन मंच संघटना राष्ट्रीय अध्यक्ष विलास जी म्हस्के यांनी सर्व उपस्थित महिलांना जागतिक महिला दिनानिमित्त फोनवरून शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अतुल सोनकांबळे यांनी सर्वांना शुभेच्छा देऊन विविध विषयावरती चर्चा घडवून आणली तर कार्यक्रमाच्या यशस्वी सर्वांनी प्रयत्न केले शेवटी आभार मानून कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमासाठी खालील महिला युवक युवती उपस्थित होते

अनुसया काळे , संगीता काळे , दिव्या काळे ,मोहीनी काळे,शुभांगी काळे,प्रियंका पवार ,लक्ष्मी पवार ,माधुरी पवार ,ऋतुजा पवार ,सचित्र्या पवार,अंजना काळे ,लक्ष्मी काळे,कुंडलिक काळे,लखन काळे,विनोशेठ पवार, करण काळे आदी उपस्थित होते.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या समर्थनार्थ पंढरपुरात भाजप महिला आघाडी मैदानात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
प्रतिनिधी/पंढरपुर : मागील काही दिवसापासून सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री व ग्रामविकासमंत्री ना.जयकुमार गोरे यांच्यावर मागील काही दिवसापासून जाणून बुजून चिखलफेक करत असून, बदनामी करण्याचे काम करत आहे. त्या महिलेवर ताबडतोब कारवाई करून तिला अटक करावी.नामदार जयकुमार गोरे यांनी विधानसभेत या बाबत स्पष्टीकरण दिलेले असून २०१६ मध्ये सदर महिला ही जयकुमार गोरे यांना ब्लॅकमेल करत होती आणि तिने त्यांच्या विरूद्ध कोर्टामध्ये केस सुद्धा केली होती, परंतु कोर्टाने जयकुमार गोरे यांची निर्दोष मुक्तता केलेली असतानाही जवळजवळ दहा वर्षांनी पुन्हा एकदा या महिलेने सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या बदनामीचे प्रयत्न चालविले आहेत.नुकतेच सदर महिलेने माध्यमाशी बोलताना आपण जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना निवेदने दिल्याचे सांगितले,परंतु हि बाब खोटी असून मंत्री महोदयांच्या बरोबरच प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बद्दल सुद्धा या महिलेने बदनामीचे काम सुरू केले आहे.एकूणच सदर महिला हेतुपूर्वक नामदार जयकुमार गोरे यांची बदनामी करीत असून या मागे मोठे षडयंत्र असल्याचेच दिसून येत आहेत. सदर ब्लॅकमेल प्रकरणामागे आणखी कोण आहेत याचा शोध घेऊन कठोर कारवाई व्हावी अशी मागणी आज भाजप महिला आघाडीकडून पंढरपूर तहसील कार्यालयात निवेदन देत करण्यात आली. यावेळी भाजप महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा प्राजक्ता बेणारे,शहराध्यक्षा ज्योती शेटे,विश्रांती भुसनर,प्रतिभा गानमोटे यांच्यासह भाजप महिला आघाडीच्या विविध पदाधीकारी व कार्यकर्त्या तसेच भाजप किसान मोर्चाचे प्रदेश सचिव माऊली हळणवर,युवा नेते प्रशांत देशमुख, बाळासाहेब माळी ,भाजप जिल्हा उपाध्यक्ष संदीप माने,बादल सिंह ठाकुर ,हरिभाऊ गावंदरे,वैभव लिंगे,अमोल डोके,कृष्णा नवटाके, ,नागनाथ फुले,दिनकर गवळी,नानासो गवळी,यदाजी मोरे,बाबासो खटकाळे यांच्यासह भाजपचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

> **बदनामीच्या षड्यंत्रामागे नक्की कोण आहेत याचा शोध घेऊन कारवाई करण्याची मागणी**

# जागतिक महिला दिनानिमित्त पांडुरंग माने फाउंडेशन च्या वतीने विद्या जाधव यांचा सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी : गेली पंधरा ते वीस वर्षे झाली पंढरपूर येथे बेवारस श्वानांना काही दुखापत झाली किंवा त्यांना भोजन देण्याचे काम असेल तर स्वखर्चाने विद्याताई कार्य करीत आहे ६५ एकर, अंबाबाई पठागण, चंद्रभागा, कॉटेज रोड अन्य ठिकाणी पायी जाऊन त्यांना अन्न पुरवण्यात काम करत आहे.

आज रतन टाटा सारख्या दिग्गज उद्योगपती यांनी श्वानासाठी मोठे हॉस्पिटल उभा केली आहे. म्हणून आज आंतरराष्ट्रीय जागतिक महिला दिनानिमित्त विद्याताई विनय जाधव यांचा पांडुरंग (तात्या) फाउंडेशन यांच्या वतीने सत्कार करण्यात आला आहे.

यावेळी समतापक निलेश माने, उपाध्यक्ष बालाजी कोळी, आकाश शिंदे, साईराम सुरवसे, रितेश जगताप, प्रसाद कोळी, दीपक शिंदे, आधी जण उपस्थित होते.

# महिला सन्मान एक दिवसापुरता मर्यादित नको : डॉ. खालकर




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी : महिला दिन फक्त एकच दिवस साजरा न करता महिलांप्रती सर्वांनी आदर आणि सन्मान ठेऊन रोजच तो साजरा करावा. महिला दिन हा एक दिवसाचा सोहळा होऊ नये. आपल्या आयुष्यातील महिलांचे स्थान पाहता, आईमुळेच आपण जग पाहतो, त्यामुळे प्रत्येकाच्या आयुष्यात आईचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे. स्त्री अबला मुळीच नाही तर अंगणातून आकाशाला गवसणी घालणाऱ्या महान शास्त्रज्ञ कल्पना चावला आणि सुनीता विल्यम्स ही स्त्रिरुपे आहेत. भारतीय संस्कृती स्त्रीत्वाला देवत्वाचे रूप देते परंतु वेळप्रसंगी स्त्री रणचंडिका झालेली बघायला मिळते, कारण समाज तिच्या सहनशीलतेचा अंत पाहतो, एक स्त्री घराचा स्वर्ग बनवू शकते आणि नरकही बनवू शकते. तिच्या अंतर्मनात नेहमीच सृजनाचे स्फुलिंग पेटलेले असते. त्यातून तिच्या मनाच्या गाभाऱ्यातून अनेक नवकल्पना जन्म घेतात आणि म्हणूनच स्त्री आज प्रत्येक क्षेत्रात अलौकिक कर्तृत्व गाजवत आहे, तोच वारसा आजच्या मुलींनी जोपासत आपल्या स्वप्नांना पूर्णत्वास न्यावे असे प्रतिपादन डॉ. माधव खालकर यांनी केले मविप्र समाजाचे क.ग.दा. मोरे महाविद्यालय निफाड येथे आंतरराष्ट्रीय महिला दिन कार्यक्रम प्रसंगी प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते, पुढे त्यांनी इतिहासातील सीतामाता,अहिल्या,ताराराणी,जिजाऊ माँसाहेब,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अशा अनेक महान स्त्रियांच्या कर्तृत्वाला उजाळा देत, अनेक श्लोक,अभंग आणि कवितांच्या माध्यमातून त्यांनी स्त्री शक्तीचा जागर केला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे. डॉ. सुरेश जाधव होते, आपल्या अध्यक्षीय मनोगतात महिलांच्या सद्यःस्थितीवर लक्षवेधी विवेचन करत, स्त्री सन्मान आणि आदर हा संस्कार जर प्रत्येकावर झाला तर अन्याय अत्याचाराच्या घटना घडणार नाहीत, यासाठी इतिहासाचे आणि संविधानाचे अनेक दाखले देत त्यांनी महिला दिनाचे महत्त्व उद्धृत केले. स्त्रियांच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत असलेल्या संघर्षाला त्यांनी उजाळा दिला आणि सद्यःस्थितीविषयी खंत व्यक्त केली. समाजाचा कठोर विरोध पत्करून आपल्या समाजकल्याणाच्या कार्यापासून परावृत्त न होता महान इतिहास घडविणाऱ्या महिला शक्तीला त्यांनी सलाम केला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन आणि दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी सर्व महिला प्राध्यापक आणि प्राध्यापकेतर सेविकांचा आणि विद्यार्थिनीचा मान्यवरांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक डॉ.सुरेखा जाधव यांनी केले, सूत्रसंचालन प्रा.पी.पी. शार्दूल तर आभार डॉ. एल.जे. सुसान यांनी मानले. कार्यक्रम यशस्विततेसाठी डॉ. पी. डी. ढेपले, प्रा. वाय.डी. कडलग तसेच वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर सेवकांनी यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमास बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# तिरस्काराच्या विषारी वातावरणात पुरस्कार बनतो नवसंजीवनी : भाई कैलास सुखधाने

## तथागत ग्रुप ने केले विविध क्षेत्रातील नामवंतांना सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : दि.०९/०३/२०२५ रोजी मेहकर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाटिका, अशोका भवनमध्ये तथागत बहुउद्देशीय संस्था मेहकर व तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटना,जिवन दिप अनाथ आश्रम व वृध्दाश्रम तसेच राजमाता माँ जिजाऊ स्वयंसहाय्यता महिला बचत गट यांच्या वतीने आयोजित नॅशनल पिपल लिडरशीप अँवार्ड व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण तसेच माजी सैनिक सन्मान सोहळा आणी कतृत्ववांन समाजिक, व राजकीय पुरुष व महिलांसाठी कार्यक्रमाचे आयोजन तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिप गवई यांच्यावतीने आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाई कैलास सुखधाने या प्रसंगी बोलतांना भाई कैलास सूखधाने म्हणाले आज संपुर्ण महाराष्ट्रात दूषित वातावरण निर्मान झाले आहे. बीड, परभणी सारख्या घटणा तिरस्काराचे बीज पेरत आहेत. अशा परिस्थितीत तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्यातील गूणवंतांना पूरस्कार वितरीत करीत आहेत. हा पूरस्कार आमच्या सारख्या कार्यकर्त्यांसाठी नवसंजीवनी देणारा ठरत आहे. असे त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगीतले. या कार्यक्रमाच्या उद्घाटक म्हणून सौ.आरती सार्थक दिक्षित ह्या होत्या.



प्रमुख उपस्थितांमध्ये सोपानराव देबाजे, रफिकभाई कुरेशी, अरुण डोंगरे, रवि मिस्कीन, छोटु गवळी, सुमेर खान, सिद्धार्थ वानखेडे, प्रकाश सुखधाने, गजानन सरकटे, मुख्याध्यापिका सौ. मनिल जोहरे, प्रतिभा गवई, निता पैठणे, कांचन मोरे उपस्थित होते.

सुरुवातीला तथागत भगवान गौतम बुद्ध व राजमाता माँ जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पुष्पमाला अर्पण करून व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रमुख अतिथींच्या स्वागत, सत्कारानंतर तथागत ग्रुप चे संस्थापक अध्यक्ष संदिप गवई यांनी प्रास्तविक सादर केले.

त्यानंतर मुख्य नॅशनल पिपल लिडरशीप अँवार्ड व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये आलेल्या सर्व मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

त्यानंतर भाई कैलास सुखधाने, सौ.आरती दिक्षित, सोपानराव देबाजे, रफिकभाई कुरेशी, रवि मिस्किन, सुमेर खान, सिद्धार्थ वानखेडे, दिलीप खरात, अरुण डोंगरे, प्रकाश सुखधाने, गजानन सरकटे, छोटु गवळी, रविद्र वाघ, देवानंद वानखेडे, मनोज बागडे,कुणाल माने, सुनिल वनारे, संदिप राऊत, गौतम पैठणे, यांच्या हस्ते नँशनल पिपल लिडरशीप अँवार्ड व राजमाता माँ.जिजाऊ गौरव सन्मान पुरस्कार तसेच साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार हा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सर्व पुरस्कार कर्त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाचे बहारदार आणि अभ्यासपूर्ण सूत्रसंचालन युवा नेते युनुसभाई पटेल यांनी तर आभारप्रदर्शन तथागत ग्रुपचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष कुणाल माने यांनी केले.

उत्कृष्ट कार्यक्रम केल्याबद्दल सर्व मान्यवरांनी तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटना व संदीपभाऊ गवई यांचे कौतुक केले.

# दुधनी जिल्हा परिषद प्राथमिक मराठी केंद्र शाळेत महिला दिन उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट (तालुका प्रतिनिधी) : अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी केंद्र शाळेत जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती कावेरी झळकी हे होती.

प्रारंभी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला उपस्थित सर्व महिला पालकांच्या हस्ते पुष्पहार अर्पण,व दीप प्रज्वलन करुन कार्यक्रम मुलांच्या स्वागत गीतांने कार्यक्रम सुरुवात केली.या प्रसंगी मल्लमा मोडलकर,कोगनूर,अल्लापूर, आळंद,बिल्लाड,सिन्नूर,शेख या आदर्श महिलांच्या सन्मान शाळेच्या वतीने करण्यात आला.

यावेळी १९९६-९७ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी शाळेला एचपी कंपनीचा प्रिंटर व स्कॅनर भेट म्हणून प्रदान केला. या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.सदर कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी, उपाध्यक्ष हनुमंत कलशेट्टी, शिक्षण तज्ञ तथा रिपाइं सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,समिती सदस्य मिहीदीमियाँ जिडगे,श्रीशौल चिंचोली,शिक्षक सुशांत गद्दी (सर),पंजाब नॅशनल बँकेचे मॅनेजर शंकर कुंभार,व्यापारी चन्नू हावशेट्टी,आयटी कंपनीचे मॅनेजर पदावर कार्यरत असलेले शिवलिंग झळकी,शाळेतील कर्तव्यदक्ष शिक्षिका सौ.अंजली गुंजोटे मॅडम, सह शिक्षक सुहास पवार सर,पोमू राठोड सर,संजीवकुमार बेंनिसुर सर आणि रविकुमार कोरचगाव सर आदी सह पालक विध्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येत उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन केंद्रप्रमुख सुरेश शेटगार सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.पालक व ग्रामस्थांच्या सहकार्य व मार्गदर्शन हा शाळेच्या सर्वांगीण विकासाला बळ मिळेल,असा विश्वासनीय मत उपस्थितांनी मनोगत व्यक्त केली आहे.

# भिमाई आश्रमशाळेत महिला दिन उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी :अतुल सोनकांबळे : (दि.८) मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट इंदापूर संचलित प्राथमिक,माध्यमिक,उच्च माध्यमिक आश्रमशाळा तसेच मुलांचे व मुलींचे अनुदानित वसतिगृह यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संकुलात प्राचार्या अनिता साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला.

याप्रसंगी आश्रमशाळेतील मुलींनी महिला दिनाच्या कार्यक्रमाचे नियोजन केले. यावेळी विद्यार्थींनींनी बहुजन महामातांच्या प्रतिमांना पुष्पहार व संस्थेचे दिवंगत अध्यक्ष



रत्नाकर मखरेंच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विद्यार्थीनींनी कर्तबगार महिलांविषयी कविता गायन तसेच भाषणं देखील केले. याप्रसंगी शिक्षक नानासाहेब सानप यांनी जागतिक महिला दिनाचे महत्त्व सांगितले.भारतातील कर्तबगार महिलांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली तसे त्यांच्यापासून प्रेरणा व त्यांचे आदर्श घेण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले. यावेळी शाळेतील महिला शिक्षकांचा सन्मान करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

सदर कार्यक्रमास संस्थेचे सचिव ॲड. समीर मखरे, मुख्याध्यापक साहेबराव पवार, प्राचार्या अनिता साळवे,सविता गोफणे, मनीषा मखरे, मेघा यादव,नीता जगताप तसेच संस्थेतील सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# रामपूर शाळेचा सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : तालुक्यातील रामपूर येथे दि. (५ रोजी) भव्य दिव्य आणि दिमाखदार असा स्नेहसंमेलन संपन्न झाला. सुरुवातीस महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.





या कार्यक्रमाचे उद्घाटन दीप प्रज्वलन व फीत कापून उमरगा पोलीस निरीक्षक श्रीमती अश्विनीताई भोसले, एपीआय श्रीकांत भराटे, बीट विस्तार अधिकारी मोहिते , ग्रामपंचायत अधिकारी वेदपाठक,सरपंच जानकाबाई भोसले, उपसरपंच संतोष भोसले, छावा क्रांती संघटनेचे तालुकाध्यक्ष विष्णू भोसले,अनंत भोसले, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हणमंत दासमे, उपाध्यक्षा मीनाक्षीताई कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी, विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी तालुक्यातील अनेक शिक्षक आवर्जून उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांच्या स्वागतानंतर निसर्ग प्रेमी ग्रुप उमरगा सर्व सदस्यांचा वृक्षमित्र पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आले. तसेच श्री टी व्ही कांबळे , श्री सी व्ही कांबळे ,श्री गायकवाड बी जी, श्रीमती वेल्हाळ यांचे 'ग्रामशिक्षक रत्न' पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

या सांस्कृतिक कार्यक्रमास ओमकार स्वरूपा व देवा श्री गणेशा या गणेश वंदनाने सादरीकरणास सुरुवात झाली. खारी बिस्किट, झुलवा पाळणा, पिचली माझी बांगडी, कोळी डान्स,माऊली डान्स, यासारखे विविध प्रकारच्या गाण्यावर विद्यार्थ्यांनी मनमोहक नृत्य सादर केले. एकूण ३६ गाण्यांचे सादरीकरण करण्यात आले. या बरोबरच 'गुडघ्याला बाशिंग'हे सुंदर विनोदी नाटिका विद्यार्थ्यांनी सादर केले.

या कार्यक्रमास पालक, ग्रामपंचायत सदस्य , शालेय व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पद्मावती मल्टीस्टेटतर्फे महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा गौरव सोहळा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनीधी : पद्मावती मल्टीस्टेटच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा भव्य सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला

यावेळी आरोग्य क्षेत्रात सामजिक सेवा देणाऱ्या कांते मॅडम आणि अत्यंत गरीब परिस्थितीतून क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या राणी बनसोडे (काही कारणास्तव उपस्थित नसल्या कारणाने त्यांचे आई-वडील उपस्थित होते) यांचा आपल्या संस्थेतर्फे सन्मानचिन्ह देऊन सन्मान



करण्यात आला. कॅशियर विद्या मॅडम यांचा देखील सत्कार करण्यात आला. सोबतच उपस्थित सर्व महिलांचे गुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या मॅडम आणि प्रास्ताविक मोहम्मद नबी सर यांनी केले यावेळी सत्कारमूर्तींनी आपल मनोगत व्यक्त केलं आणि संस्थेने केलेल्या आयोजनाबद्दल संस्थेचे कौतुक केले.

# माहेरा सोहेल फरास यांनी वयाच्या सहाव्या वर्षी पहिला केला पहिला रोजा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी

अक्कलकोट शहरातील मौलाली गल्ली येथील सोहेल फरास यांची लेक ६ वर्षाच्या चिमुकल्या माहेरा सोहेल फरास यांनी आपल्या जीवनातील पहिला रोजा पूर्ण केला.

पवित्र रमजान महिना सुरू आहे, ज्यामध्ये मुस्लिम धर्मात महिनाभर रोजे (उपवास) केले जाते, कुटुंबातील मोठ्या जणांना रोजा करताना पाहून लहान मुले ही उत्सुकतेने रोजा करण्याचा अट्टहास करतात, असंच काही माझी चिमुकली माहेरा बाबतीत झालं, गेल्या चार दिवसांपासून त्याने निश्चय केला होता की रविवारी शाळेची सुट्टी असुन या दिवशी रोजा ठेवायचाच!

इस्लाममध्ये कलमा, नमाज, रोजा, जकात, हज हे पाच प्रमुख तत्व आहे. यात प्रत्येकाने रोजा ठेवणे बंधनकारक आहे. रमजान महिन्यात मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात रोजे (उपवास) करतात. मोठ्यासह लहान मुले, मुलीही रमजानचे उपवास करतात.

प्रामुख्याने ७ वर्षांपेक्षा लहान मुले, मुली रोजाचा उपवास करीत नाहीत. परंतु माहेराने पहिला उपवास करण्याचा हट्ट करत तो पूर्ण केला. रोजा सोडण्यापूर्वी माहेराला आजी कडून नवीन कपडे व फुलाचा हार घालण्यात आले. ९ मार्च पहाटे ५:२२ ला घरच्यांबरोबर सहरी म्हणजेच दोनच घास मॅगी जेवण केली, ठरल्याप्रमाणे त्याने आज दिवसभर अन्न पाणी त्याग करुन आणि सायकळी ६:३७ मिनटानी तब्बल १३ तासांनी उपवास सोडला व जीवनातील पहिला रोजा पुर्ण केला,



महेराने आपल्या जीवनाचा पहिला रोजा कमी वयात व चिकाटी पूर्ण केल्याबद्दल माहेराचा समाजातील सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. आजी आजोबा,आई वडील,काका, काकु आणि भाऊ आधी गल्लीतील सर्व मित्र परिवाराने शुभेच्छा दिल्या.

### नळदुर्ग येथे रिपाइंच्या वतीने महिला दिन साजरा

### डॉ. अभिजित पाटील यांचे प्रतिपादन

# एक स्त्री शिकली तर सुंपुर्ण कुटुंबाची सुधारणा होते

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : छत्रपती शिवाजी महाराज याना घडविणारी माँ.जिजाऊ,उत्तम प्रशाशक राजमाता आहिल्यादेवी होळकर,क्रांती ज्योती सावित्रीमाई फुले यांच्या क्रांतीकारी विचारांचा आदर्श समोर ठेवून स्त्रियानी शिक्षण



घेवून आपली प्रगती साधण्याचा प्रयत्न करवा कारण एक स्त्रि शिकली तर संपूर्ण कुटूंबाची सुधारणा होते,घराला घरपण येते.असे गौरव उदगार येथील वैद्यकिय आभिकारी डॉ.अभिजीत बागल यानी नळदुर्ग येथे बोलताना काढले.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले) शहार शाखा नळदुर्ग व भाजपा मेडिया सेल च्या वतीने उप जिल्हा रुग्नालय नळदुर्ग ता.तुळजापूर येथे जागतिक महिला दिना निमित्त सर्व आरोग्य सेवेत कार्यरत असलेल्या आरोग्य सेविका व महिला आधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षिय स्थानावरून डॉ.बागल बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की घर संसाराची सर्व कोटूंबिक बजाबदारी सांभाळून आमच्या महिला आरोग्य कर्मचारी आपले कर्तव्या प्रामाणिक पणे बजावत रुग्नाची

सेवा करतात.या वेळी प्रामुख पाहूणे म्हनूण वैद्यकिय आधिकारी डॉ.प्रशांत शिंदे, डॉ.अविनाश भोरे आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आरोग्य महिला कर्मचारी निर्मला तोडकर,अनिता कोळी, निर्मला भालेराव, काळे एस.मॅडम,एम. ए. मुल्ला,आश्विनी शेरखाने,पुजा केसकर,जयश्री गुंड, आदींचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन रिपाइं (आठवले ) चे जिल्हा सचिव तथा पत्रकार एस.के.गायकवाड यानी केले तर अभारप्रदर्शन रिपाइंचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे यानी केले. यावेळी रिपाइंचे नेते दुर्वास बनसोडे,नळदुर्ग शहर कार्याध्यक्ष महादेव बनसोडे,उत्तम झेंडारे,अनिल वाघमारे,भाजपा माडिया सेल चे तालूका अध्यक्ष किशोर धुमाळ, अरोग्य कर्मचारी सुरेश शेलार,उद्धव मस्के,सह कार्यकर्ते उपस्थित होते.या प्रसंगी सुखी मल्टी स्टेट नळदुर्ग च्या वतीने ही विलास हाडगे,अजय ठाकूर, रामानंद लंगडे यानी ही जागतीक महिला दिनाच्या निमित्ताने येथिल सर्व महिला आरोग्य कर्माचांचा सत्कार करण्यात आला.

# भाजपा युवा मोर्चाचे सरचिटणीस शिवशंकर स्वामी यांची श्री स्वामी समर्थ औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटी आय) येथे व्यवस्थापन समितीवर शासकीय सदस्य म्हणून निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट प्रतिनिधी/हणमंत घोदे



भाजपा युवा मोर्चाचे सरचिटणीस शिवशंकर स्वामी यांची श्री स्वामी समर्थ औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटी आय)येथे व्यवस्थापन समितीवर शासकीय सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. श्री स्वामी समर्थ, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट या महाविद्यालयात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या एसटी पास, ज्या त्या महाविद्यालयाकडून जाचक अटी बाबत निवारण, विद्यार्थ्यांचे ॲडमिशन, विद्यार्थ्याकरिता महाविद्यालयातील सोयी सविधा बाबत आवाज उठविणे, समस्या सोडविने, आता शासनाच्या माध्यमातून संस्थेच्या व्यवस्थापन समितीवर काम करण्याची संधी मिळाली याचे सर्व विद्यार्थी आणि संस्थेची काही समस्या व विकासाच्या दृष्टीने कार्य करणार असल्याचे शिवशंकर स्वामी सांगितले.

त्यांच्या या निवडीबद्दल आमदार सचिन कल्याणशेट्टी, नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, स्वामी समर्थ देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष महेश इंगळे, नगरपालिका पक्षनेते महेश हिंडोळे, भाजपा शहराध्यक्ष शिवशरण जोजन, बालाजी पाटील, अल्पसंख्याक अध्यक्ष नन्नू कोरबू आदींनी शुभेच्छा दिल्या.



# नळदुर्ग शहरात विविध ठिकाणी नारी शक्तीचा सन्मान

## अंतरराष्ट्रीय महिला सन्मान दिन मोठ्या उत्साहात साजरा







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग या ऐतिहासिक शहरात नळदुर्ग आणि परिसरातील शासकीय निमशासकीय सेवेतील महिला कर्मचाऱ्यांचा व सर्व सामान्य महिलांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत पर सत्कार करण्यात आला यावेळी नळदुर्ग येथील डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष तथा मुख्य प्रवर्तक मारुती खारवे यांच्या मार्फत सर्व शिक्षकांचा शाल फेटे पुष्पहार पुष्पगुच्छ सावित्रीमाईचे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला नळदुर्ग येथील शिवम कम्प्युटर सेंटर चे मुख्य प्रवर्तक तथा नळदुर्ग शहर व्यापरी महासंघाचे अध्यक्ष सतीश पुदाले यांनी सर्व विद्यार्थिनी व शिक्षकांचा पुस्तक एक पेन देऊन गौरव करण्यात आला नळदुर्ग येथे बस सेवेमध्ये कार्यरत असलेल्या मुमताज मोमीन या वाहकाचा सत्कार पत्रकार इरफान काझी पत्रकार संपादक दादासाहेब बनसोडे यानी केला जिल्हा परिषद कन्या प्रशालीतील सर्व शिक्षकांचा मुख्याध्यापक कमलाकर गायकवाड यांनी पुष्प-गुच्छ देऊन सन्मान केला सय्यद अब्दुल्ला उर्दू मेमोरियल हायस्कुल येथे सर्व महिला शिक्षकांचा सत्कार करण्यात आला जिल्हा उपजिल्हा रुग्णालय नळदुर्ग येथील सर्व परिचारिका यांचा सत्कार रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे माजी शहराध्यक्ष दत्त-ात्रय बनसोडे कार्याध्यक्ष महादेव कांबळे आदिनी पुष्पगुच्छ सत्कार केला याचबरोबर शहरातील विविध ठिकाणी बस स्थानक डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधान चौक क्रांती चौकामध्ये राजमाता अहिल्याबाई होळकर चौकात महिलांच सत्कार करण्यात आला.

## महिला दिना निमित्त वसंत नगर नळदुर्ग येथे अंगणवाडीत मुलीच्या जन्माचे स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



वागदरी/एस.के. गायकवाड : जगभरात जागतिक महिला दिन विविध उपक्रमाने साजरा होत असतानाच तुळजा-पूर तालुक्यातील वसंत नगर नळदुर्ग येथिल अंगणवाडीत मात्र कन्यारत्न जन्माचे स्वागत करून एक अगळ्या वेगळ्या उपक्रमाने जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

वसंत नगर नळदुर्ग येथील अंगणवाडी क्रमांक ५ व ८ च्या वतीने नागरी विभागाच्या परिवेक्षिका अनिता कांबळे यांच्या मार्ग दर्शनाखाली अंगणवाडी सेविका अशा लक्ष्मण गायकवाड व संगीता सुरेश राठोड यांच्या पुढाकारातून जागतिक महिला दिना निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करन्यात आले होते. प्रारंभी माजी नगर सेविका छमाबाई राठोड, सहशिक्षिका वंदना वाघमारे, श्रीमती कुंभालकर मॅडम यांच्या हस्ते क्रांती ज्योती सावित्रीमाई फूले यांच्या प्रतिमेचे पुजन करून आभिवादन करण्यात आले.

माता सोना-ली लोंढे याना नुकतेच कन्यरत्न झाले आहे.त्या कन्यारत्नाचा'अर्थात मुलीच्य जन्माचे महिला मान्यवरांचा हस्ते गुलाब पुष्प देवून स्वागत करून मोठ्य उत्साहाने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

यावेळी अंगणवाडी मदतनिस वैजंताबाई लोंढे, शेख नुरजहाँ, रिपाइं (आठवले) चे दुर्वास बनसोडे,बाबासाहेब बनसोडे,एस. के.गायकवाड, महादेव कांबळे, उत्तम झेंडारे,अनिल वाघमारे,पत्रकार किशोर धुमाळ सह महिला उपस्थित होते.

## महिला आर्थिक विकास महामंडळाचा ५० वा वर्धापन दिन सुवर्ण महोत्सव वर्ष उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वय अधिकारी सोमनाथ लामगुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला दिन व महिला विकास मंडळाचा सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त यशस्विनी लोकसंचालित साधन केंद्र पान मंगरूळ यांनी वळसंग वाडा या ठिकाणी महिला आर्थिक विकास महामंडळाचा ५० वा वर्धापन दिन सुवर्ण महोत्सवी वर्ष मोठया उत्स-ाहात साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमासाठी बँक ऑफ महाराष्ट्र वळसंग शाखेचे सुरेश तोटा, बँक ऑफ इंडिया जेऊर शाखेचे प्रतिनिधी व महिला व बाल विकास विभाग अंतर्गत वन स्टॉप सखी मंचकडून शुभांगी कांबळे, आयसीआयसीआय बँकेचे प्रतिनिधी दिपाली लोमतुरे, एमआयडीसीचे ठाण्याचे पो-लीस हवालदार मंजुळा चडचणे, यशस्विनी लोकसंचालित साधन केंद्रांचे अध्यक्ष पुष्पा कोरेप्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्व-लन व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमीचे पुजन करण्यात आले.

त्यानंतर प्रार्थना, मान्यवरांचे स्वागत व सीआरपी रंजना देशमुख व सीआरपी उज्वला हज-ारे यांनी माविम व यशस्विनी लोकसंचालित साधन केंद्रात आल्यानंतर त्यांच्या जीवनात ते आर्थिक दृष्ट्या व सामाजिक दृष्ट्या सक्षम कशा पद्धतीने झाले याचे त्यांनी मनोगत सांगितले. उचठउ लेखा-पाल शुभांगी भोसले हरदास यांनी विषयक म्हणजे स्थापना, कार्य व विविध योजना याची माहिती दिली. आयसीआयसीआयचे दिपालीलोमतुरे यांनी यशस्विनी लोकसंख्येचे साधन केंद्रासोबत व सहयोगिनी सोबतचा अनुभव सांगितला. एमआयडीसी ठाण्याचे पोलीस हवालदार मंजुळा चडचणी यांनी महिला सबलीकरणासाठी व आपल्या जीवनातील काही अडचण सांगितल्या. यशस्विनी लोकसंचलित साधन केंद्र चे अध्यक्ष पुष्पा कोरे यांनी माविमा वर्धापन दिनाच्या दिनाच्या व जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहयोगिनी शोभा माने यांनी केले. क्षमता बांधणी सहयोगिनी ललिता कांबळे यांनी आभार प्रदर्शन केले. त्यानंतर महिलांसाठी मनोरंजन चे काही खेळ म्हणजे संगीत खुर्ची, बॉम्बस्फोट, डान्स करण्यात आला. अशा पद्धतीने महिला आर्थिक विकास महामंडळाचा ५० वर्धापन दिन व जागतिक महिला दिन महिलांचा सन्मान करून साजरा करण्यात आला.

## अक्कलकोट येथे हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेतर्फे महिला दिन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात मनोरमा मल्टीस्टेट सोसायटी सोलापूरच्या चेअरमन शोभाताई श्रीकांत मोरे प्रमुख उपस्थित होत्या. महिलांनी आर्थिक, सामाजिक व मानसिकदृष्ट्या सक्षम व्हावे, असे त्या यावेळी म्हणाल्या.

कार्यक्रमास हिकरणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा अलकाताई जन्मेजयराजे भोसले, सचिवा अर्पिताराजे अमोलराजे भोस-ले आणि त्यांची टीम सतत महिलांसाठी कार्यरत असल्याचे गौरवोद्गार मान्यवरांनी काढले.

यावेळी मनोरंजनात्मक खेळ, प्रश्नमंजुषा, बौद्धिक खेळ, गप्पा-गोष्टी आणि गेम्स अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेतील विजेत्यांना जयश्रीताई मगर, अनुयाताई फुगे, आरती काळे, रुपाली शहा, मल्लम्मा पसारे, माजी नगराध्यक्षा अनिताताई खोबरे, माजी नगरसेविका सोनालीताई शिंदे, जयश्री सुरवसे, स्नेहल जाधव, सविता खोबरे, धनश्री पाटील यांच्या उपस्थितीत बक्षीस देण्यात आले.

कार्यक्रमास पंचक्रोशीतील शेकडो महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले तर आभार स्मिता कदम यांनी मानले.

## पोलीस महिला वर्गांनी कामाबरोबर योगा प्राणायाम ध्यान करून आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे : सुनिता तांबे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिर्डी : जागतिक महिला दिनानिमित्त शिर्डी पोलीस स्टेशन येथे आर्ट ऑफ लिविंग परिवाराने पो-लीस महिला कर्मचाऱ्यांसाठी योगा प्राणायाम ध्यान असे सत्र आयोजित केले होते त्याचबरोबर पोलीस महिलांचा सन्मानही करण्यात आला परमपूज्य गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या मार्गदर्शनाने लोणी येथील आर्ट ऑफ लिविंगच्या प्रशिक्षिका श्रीमती सुनीता तांबे यांनी पोलीस महिला हे जीवन खूप धावपळीचे असते त्यांना अनेक प्रसंगांना तोंड द्यावे लागते त्यांनी रोज स्वतः ला थोडा वेळ देऊन योगा प्राणायाम ध्यान सूर्यनमस्कार करून आपले आरोग्य कसे चांगले ठेवता येईल व तणावमुक्त जीवन कसे जगता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे आपले आरोग्य चांगले राहिले तरच आपण आनंदी होऊन काम करू शकतो असे मोलाचे मार्गदर्शन पोलीस महिलांना केले त्यांच्याबरोबर आर्ट ऑफ लिविंग चे प्रशिक्षक गणेश मुसमडे यांनीही महिलांना काही प्राणायामाचे व ध्यानाचे प्रकार शिकविले तसेच आर्ट ऑफ लिविंग परिवाराच्या वतीने सर्व पोलीस महिलांचा सन्मानही करण्यात आला तसेच पोलीस उपविभागीय अधिकारी शिरीष वमने सर यांनी श्रीमती सुनिता तांबे व गणेश मुसमडे यांचा पोलीस स्टेशनच्या वतीने सत्कार करण्यात आला याप्रसंगी पीआय रणजीत गलांडे सर, पोलीस हेड कॉन्स्टेबल रासकर मॅडम, श्री पंढरीनाथ पगार उपस्थित होते.



## पीरपाशा पिरजादे पाटील यांचे कार्य कौतुकास्पद, महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : प्रत्येक यशस्वी माहिला व पुरुषाच्या मागे आईचा भक्कम हातभार असत-ो, माझा त्यावर पूर्ण विश्वास आहे. कारण आई - वडिलांच्या आशिर्वादाने अंगणवाडी,कॉलेज पासुन नोकरीच्या उंबरठ्यापर्यन्त व नोकरीच्या अनोळखी क्षेत्रात उतरण्याचे धाडस करून अनेक अडचणींवर मात करून ते नोकरीत यशस्वी झाले.त्या यशामागे आईचा भक्कम आशिर्वाद कारणीभूत असतो,असे भावनिक उदगार अक्कलकोट ग्रामिण रूग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अशोक राठोड यांनी केले.

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे पीरपाशा पिरजादे पाटील यांच्याकडून जागतिक महिला दिनानिमित्त अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयातील महिला कर्मचाऱ्यांचा फेटा शाल व गुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी डॉ.अशोक राठोड बोलत होते.यावेळी व्यासपिठावर प्रगतशील शेतकरी शिवानंद बिराजदार,सिद्धाराम गंगोंडा,गुरप्पा गंगोंडा, वैद्यकीय अधिकारी डॉ.रवींद्र बनसोडे,डॉ.सतीश बिराजदार,फकीरा दलाचे जिल्हाध्यक्ष ज्योतिबा पारखे व परिवर्तन कुष्ठरोग कर्मचारी संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष जगन्नाथ ढगे,विश्वनाथ चव्हाण,राजेश जगताप,स्वामीराव गायकवाड,अजित राठोड अनिल इंगळे,अश्पाक मुल्ला,सिद्धू पुजारी,औषध निर्माता ईरण्णा चिं-चीगोडे व गंगाराम राठोड उपस्थित होते.

पुढे बोलतांना डॉ.अशोक राठोड म्हणाले की, महिला दिनाच्या औचित साधून पीरपाशा पिरजादे पाटील यांनी ग्रामीण रुग्णालयातील महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान केले.या सन्मानामुळे कर्मचाऱ्यांना काम करण्याची हिम्मत्व बळ मिळते. चांगल्या काम करणाऱ्याचे समाज त्याचे मोठे कौतुक करते,हे नक्कीच आहे.खरे तर प्रत्येक स्त्रीमध्ये एक उद्योजिका सुप्तरुपात वसलेली असते.स्त्रियांना निसर्गतःच नेटके नियोजन, व्यवहारी वृत्ती, वास्तवा-चे भान, व्यवस्थापकीय कौशल्य, दूरदृष्टी आणि संयम अशा गुणांची देणगी लाभलेली असते.प्रगती व यशासाठी महिलांची साथ अवश्य घेतली पाहिजे,असे ते म्हणाले.

**कर्तृत्ववान मुलाच्या मागे आईचाच आशिर्वाद : अधिक्षक डॉ अशोक राठोड**

यावेळी सुप्रिया कबसे,पायल वानखेडे,मनीषा सलगर,निकिती पुजारी,प्रमिला वाघमारे,सुरेखा वर्दे, नागम्मा नंदे,ललिता चिंचोरे,हरणाबाई बंदपट्टे,सरस्वती तळभंडारे,गीता चिंचोळकर,जानकी कामठी,वंदना जाधव,संजीवनी सूर्यवंशी या सर्व महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

## तेरवाडात महिला दिनानिमित्त बेटी बचाव बेटी पढाओ कार्यक्रम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दत्तवाड/प्रतिनिधी : दि.६-३-२०२५ रोजी जिल्हा महिला व बाल विकास विभाग कोल्हापूर व जिल्हा बाल संरक्षण कक्ष कोल्हापूर अंतर्गत चाईल्ड हेल्पलाइन कोल्हापूर व ग्रामपंचायत तेरवाड यांच्यावतीने संजीवनी इंग्लिश मीडियम स्कूल तेरवाड या ठिकाणी महिला दिनानिमित्त-ाने 'बेटी बचाव -बेटी पढाओ'कार्यक्रम घेण्यात आला.

सदरच्या कार्यक्रमाअंतर्गत बालमजुरी, बालविवाह, लैंगिक, शारीरिक, मानसिक छळ, बाल संगोपन योजना, अनाथ प्रमाण पत्र, महिला सक्षमीकरण जनजागृती कार्यक्रम व माहिती देण्यात आली. या कार्यक्रमासाठी चाईल्ड हेल्पलाइनचे जुबेर शिकलगार,भाग्यश्री गावडे,अतुल चौगले,मंगल पाटील,तेरवाड गावच्या सरपंच सौ.पौर्णिमा गोंधळी ग्रामपंचायत अधिकारी महालिंग अकिवाटे,स्कूलच्या प्राचार्या शिंदे मॅडम स्कूलचे शिक्षक स्टाफ,विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.